**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ७८/२०१९** **दिनांक २७/०९/२०१९** **कालावधी ५ दिवस**

**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २१/०९/२०१९ ते २७/०९/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २८/०९/२०१९ सकाळी ८:३० पासून ०२/१०/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **२१/०९** | **२२/०९** | **२३/०९** | **२४/०९** | **२५/०९** | **२६/०९** | **२७/०९** | | **२८/०९** | **२९/०९** | **३०/०९** | **०१/१०** | **०२/१०** |
| ५.६ | ६.४ | ०.० | ०.२ | ८७.४ | ६.६ | ८.४ | **पाऊस (मिमी)** | ९ | १० | ८ | ० | १० |
| - | - | - | - | - | - | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३० | ३१ | ३२ | ३१ | ३१ |
| - | - | - | - | - | - | - | **किमान तापमान (अं.से)** | २४ | २४ | २५ | २५ | २५ |
| - | - | - | - | - | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ८ | ८ | ७ | ६ | ५ |
| - | - | - | - | - | - | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ९४ | ९४ | ९४ | ९४ | ९४ |
| - | - | - | - | - | - | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ८१ | ७७ | ७४ | ७२ | ७६ |
| - | - | - | - | - | - | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ८ | ८ | ६ | ६ | ५ |
| - | - | - | - | - | - | - | **वाऱ्याची दिशा** | आ. | आ. | आ. | आ.पू. | आ.पू. |
| | | | | | | **पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत** | | | | **पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा** | | |
| **११४.६** | | | | | | **४९२६.६** | | | | **३५५८.३** | | |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक २८ ते ३० सप्टेंबर व २ ऑक्टोबर,२०१९ रोजी हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून आकाश मेघाच्छादित राहील.**

**दिनांक २७ सप्टेंबर ते ३ ऑगस्ट,२०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा जास्त राहील.**

**सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार रायगड जिल्ह्यामध्ये वनस्पती निर्देशांक मध्यम स्वरूपाचा आणि प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार ओलावा स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **भात** | **फुलोरा ते दाणे भरणे अवस्था** | • पर्जन्यमान कमी असल्याने आणि निमगरवे भात दाणे भरण्याच्या अवस्थेत व गरवे भात फुलोरा अवस्थेत असल्याने भात खाचरात पाण्याची पातळी ५ सें.मी. पर्यंत ठेवावी.<br>• हळवे भात पक्व होवू लागल्यास कापणी पूर्वी ८-१० दिवस भात खाचरातील पाणी बाहेर काढून टाकावे.<br>• गरव्या भात पिकास नत्र खताची तिसरी मात्रा ७१ किलो युरिया प्रति हेक्टरी पिक फुलोऱ्यात असताना देण्यात यावी.<br>• पुढील पाच दिवस पाउसाची उघडीप असून ढगाळ वातावरण असण्याची शक्यता असल्यामुळे पाणी साचून राहणाऱ्या तसेच घन लागवड आणि नत्र खताची अवाजवी मात्रा दिलेल्या भात खाचरात तपकिरी तुडतुड्यांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. पिकाचे तपकिरी तुडतुड्यांचा प्रादुर्भावावर सातत्याने लक्ष ठेवावे. जर रोपाच्या चुडात ५ ते १० तुडतुडे आढळल्यास ॲसिफेट ७५ टक्के पाण्यात विरघळणारी भुकटी २.२५ ग्रॅम किंवा फिप्रोनिल ५ टक्के प्रवाही २ मि.ली. किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के प्रवाही ०.२ मि.ली प्रति लिटर पाण्यातून भात पिकावर फवारावे. तसेच खाचरात पाणी जास्त काळ न साठता फोडून लावावे व नवीन पाणी साठवण्याची व्यवस्था करावी. टिप : फवारणी करताना कीटकनाशक चुडाच्या बुंध्यावर पडेल याची दक्षता घ्यावी.<br>• पाऊसाची उघडीप, वाढते ऊन व आर्द्रतेचे प्रमाण यामुळे वरकस आणि उतार असलेल्या जमिनीतील हळव्या जातीच्या भात पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्यामुळे पिकाचे चांगले निरीक्षण करावे. ज्या विभागामध्ये प्रादुर्भाव आढळून येत आहे, त्या ठिकाणी भातखाचरात एकरी तीन ते चार पक्षी बसण्याचे थांबे उभे करावेत. जेणेकरून पक्षी या अळ्या नष्ट करतील. तसेच सकाळी किंवा सायंकाळी भातखाचरात जाऊन चूड उघडून पाहावेत. त्यामध्ये अळी/कोष प्रतिचुड १ याप्रमाणे आढळल्यास डायक्लोरव्हॉस ७६ डब्लू.एस.सी. १३ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यातून सायंकाळी किंवा सकाळी लवकर वारा शांत असताना फवारावे. **टिप :** फवारणी करताना कीटकनाशक चुडाच्या बुंध्यावर पडेल याची दक्षता घ्यावी |
| **आंबा** | **पालवी** | • पुढील पाच दिवस पाऊसाची उघडीप असल्याने आंबा बागेतील गवत काढून स्वच्छता करावी. बांडगुळे, मृत फांद्या तसेच निर्जीव फांद्या कापून फांद्यांची विरळणी करावी, तसेच हवेतील आर्द्रतेमुळे फांद्यावर रोग येवू नये म्हणून १ टक्के बोर्डोमिश्रण किंवा ०.२५ टक्के कॉपर ऑक्सिक्लोराईड २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून संपूर्ण झाडावर फवारणी करावी.<br>• वाढत्या तापमानामुळे आंब्याच्या नवीन येणाऱ्या पालवीवर तुडतुडे, शेंडे पोखरणारी आणि मिजमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पालवीचे किडींपासून संरक्षण करण्यासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही २५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पाऊसाची उघडीप असताना फवारणी करावी. |
| **काजू** | **पालवी** | • पुढील पाच दिवस पाऊसाची उघडीप असल्याने काजू बागांची गवत काढून साफसफाई करावी. वाळलेल्या, मृत आणि अशक्त फांद्या कापून विरळणी करावी व कापलेल्या भागावर बोर्डोपेस्ट लावावी तसेच १ टक्के बोर्डोमिश्रणाची संपूर्ण झाडावर फवारणी करावी.<br>• वाढत्या तापमानामुळे काजूच्या नवीन येणाऱ्या पालवीवर ढेकण्या व फुलकिडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पालवीचे किडींपासून संरक्षण करण्यासाठी नवीन पालवी फुटण्याच्या वेळी मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के प्रवाही १५ मि.ली. किंवा लॅम्बडा |

| | | |
|---|---|---|
| | | सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **भाजीपाला पिके** | **फळधारणा** | • भेंडी पिकामध्ये वाढत्या तापमानामुळे हळद्या रोगाचा प्रादुर्भावाची शक्यता असल्याने, प्रादुर्भाव दिसून आल्यास रोगग्रस्त रोपे उपटून टाकावीत. डायमेथोएट १ मि. ली. प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी तसेच पिकामध्ये पिवळ्या रंगाची चिकट कार्ड ठेवावीत. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या** | -- | • शेळ्यांना घटसर्प रोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पशु वैद्यकिय अधिकारी सल्ल्याने लसीकरण करून घ्यावे.<br>• फुलोऱ्यावर असलेल्या हिरवा चाऱ्याची मुरघास पद्धतीने साठवण करावी. यासाठी प्रत्येकी १०० किलो बारीक तुकडे केलेल्या गवतावर ५ ते ६ लिटर पाण्यामध्ये तयार केलेले द्रावण (२ कि. गूळ + अर्धा कि. युरिया + १ कि. मीठ) शिपडावे. प्रक्रिया केलेल्या गवताचे थर रचून बाजारात सहज उपलब्ध असलेल्या प्लास्टिक सायलो पूर्ण भरावेत. पाउस आणि उष्णते पासून संरक्षणासाठी सायलो शेड मध्ये ठेवावेत. अशा पद्धतीने २-३ महिन्यामध्ये मुरघास जनावरांना खाण्यासाठी तयार होतो. |
| **कुकुटपालन** | | • कोंबड्यावरील राणीखेत रोगावर पशुवैद्यकीय अधिकारी सल्ल्याने लसीकरण करून घ्यावे.<br>• पक्ष्यांच्या आणि शेडच्या स्वच्छतेकडे नियमित लक्ष द्यावे. |
| **टीप: फवारणी ३ ते ४ तासांची पाऊसाची उघडीप असताना करावी.** | | |
| **सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.**<br>**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा** | | |